## नियमित दिवाणी दावा क्र. ४२६/२०१३ मधील
## निशाणी ४४ व निशाणी ४९ वरील एकत्रीत आदेश

( मनिषा गुरव विरुध्द उत्तम गुरव वगैरे ३)

१. यातील वादी यांनी निशाणी ४४ वर श्री. बाबासाहेब अशोक वरणे, रा. आष्टा, ता. वाळवा यांनी गट नंबर ८९३ मध्ये त्यांचे नावे गेलेले ऊस बिल मा. मॅनेजर, श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लि. सांगली, ता. मिरज यांना कोर्टामध्ये जमा करणेविषयी अर्ज दिलेला आहे. तर निशाणी ४९ वर प्रतिवादी क्र. २ व श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांनी या अर्जास म्हणणे देण्यास मुदत मागितलेली आहे.

२. वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे असे की,

प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व डिक्लेरेशनसाठी दाखल केला असून प्रतिवादी क्र. १ हे मयत झाले असून त्यांचे पश्चात दावा मिळकतीत वादीचा हक्क आहे. मात्र प्रतिवादी क्र. २ हे संपूर्ण मिळकती गिळंकृत करणेच्या उद्देशात असून त्यांनी दावा कलम १अ या मिळकतीमधील ऊस धुर्तपणे श्री. बाबासाहेब अशोक वरणे या इसमाच्या नावे श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लि. सांगली, ता. मिरज या कारखान्यास दि. १५/०३/२०१८ रोजी पाठविला आहे. सबब, वादी यांनी गट नंबर ८९३ मध्ये श्री. बाबासाहेब अशोक वरणे या इसमाच्या नावे गेलेले ऊस बिल मा. मॅनेजर, श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लि. सांगली, ता. मिरज यांना कोर्टामध्ये जमा करणेविषयी मागणी केलेली आहे. आजरोजी त्रयस्थ इसम बाबासाहेब वरणे याकामी हजर होवून त्यांनी या अर्जास म्हणणे देण्याची मुदत मागितलेली आहे. वादी यांनी निशाणी ४७/१ वर श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लि. सांगली, ता. मिरज यांची ऊस पावती दाखल केलेली आहे. त्यावरुन असे दिसून येते की दि. १५/०३/२०१८ रोजी दावा मिळकत गट नंबर ८९३ मधील ऊस हा श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांचे नावावर गेलेला आहे. ऊस बिलासंबंधी व्यवहार पाहता साधारणपणे ऊस नावावर गेल्यानंतर एका महिन्याच्या आत त्याची बिले त्या त्या व्यक्तीच्या नावे जमा होतात. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांना जर आजरोजी पुढील मुदत दिली तर निशाणी ४४ वरील अर्जाचा उद्देशच संपून जाईल. सबब, न्यायाच्या काराणास्तव यातील त्रयस्थ इसम यांनी पुढील नेमल्या

तारखेपर्यंत गट नंबर ८९३ मधील त्यांचे नावे गेलेल्या ऊसाचे बिल परस्पर स्वीकारु नये असा आदेश पारित करणे योग्य व रास्त होईल व प्रतिवादी यांना म्हणणे देण्यासाठी एक संधी देणे न्याय्य होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. त्रयस्थ इसम श्री. बाबासाहेब अशोक वरणे यांचेविरुध्द असा आदेश पारित करणेत येतो की, त्यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत गट नंबर ८९३ मधील त्यांचे नावे गेलेल्या ऊस बिलाची रक्कम स्वीकारु नये.

**इस्लामपूर.** **सही/---**

**दि. १३/०४/२०१८** **प्रभारी ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**इस्लामपूर.**